# Indian Academy of Pediatrics (IAP)

## महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)

## पालकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे

प्रकरण : ७८ वे

# अचानक आकडी आली की काय कराल?


अध्यक्ष २०२३ : डॉ. रमाकांत पाटील
सचिव २०२२-२३ : डॉ. अमोल पवार
अध्यक्ष २०२२ : डॉ. हेमंत गंगोलिया
मार्गदर्शक : डॉ. जयंत उपाध्ये
समन्वयक : डॉ. नरेंद्र नानिवडेकर
अनुवादक : डॉ. सौ. शर्वाणी अ. कुळकर्णी
पुनरावलोकन : डॉ. नरेंद्र नानिवडेकर
सौ. अनुपमा कुलकर्णी

*Convener:* Rishi Arora
*Members:* Anoop Kumar Verma, Rachana Dubey Gupta, Shilpa Kulkarni
*Reviewer:* Arushi Gahlot




अचानक आकडी आल्यावर पालकांनी घाबरणे अगदी स्वाभाविक आहे. मात्र ही आकडी पहिल्यांदाच आली असल्यास ताबडतोब वैद्यकीय मदत मिळणे गरजेचे असते. आकडी येणाऱ्या मुलाला जर आकडी आली तर पालकांनी काय उपाय करावे आणि काय काळजी घ्यावी याची माहिती देखील पालकांना असणे गरजेचे आहे. आज आपण हीच चर्चा करणार आहोत.

१. आकडी वरील औषधोपचार सुरु असतांना देखील आकडी येऊ शकते का?
२. माझ्या बाळाला आकडी आली तर मी काय करु?
३. माझ्या बाळाला आकडी येऊ नये म्हणून मी काय करु शकते?
४. आपोआप बाळाची आकडी थांबली तर मी काय करु?
५. बाळाची आकडी ३ ते ५ मिनिटापर्यंत येतच राहिली तर मी काय करु?
६. आकडी येते तेव्हा कोणती औषधे जवळ असावीत?
७. 'Midazolam' हे नाकपुडीतून देण्याचे औषधाची गरज पडल्यास मी काय करु?
८. आकडी येते तेव्हा काय काळजी घ्यावी?
९. 'Diazepam Suppository' ही गुदमार्गाद्वारे देण्याचा गोळीचा डोस (मात्रा) काय आहे?
१०. वैद्यकीय मदत किंवा रुग्णालयात नेण्यासाठी मी आकडीच्या कोणत्या क्षणी मदत मागू?


Under the Auspices of the IAP Action Plan 2021–2022

Piyush Gupta, IAP President 2021
Remesh Kumar R, IAP President-Elect 2021
Bakul Parekh, IAP President 2020
GV Basavaraja, IAP HSG 2020–2021
Deepak Ugra, National Co-ordinator

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** Piyush Gupta, Bakul Parekh
**IAP Co-ordinators:** GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure

### Core Group

*National Co-ordinator:* **Deepak Ugra**
*Member Secretaries:* **Upendra Kinjawadekar, Samir Dalwai**
*Members:* **Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman**

७८

# अचानक आकडी आली की काय कराल?

## प्र.१

### आकडी वरील औषधोपचार सुरु असतांना देखील आकडी येऊ शकते का?

बाळाला बरे वाटत नसेल, आकडी थांबविण्याची औषधे खंडित झाली असतील, झोप अपुरी असेल, भावनिक ताण असेल तर अचानक आकडी येऊ शकते. मुलींना मासिकपाळीच्या दरम्यान हा त्रास होवू शकतो व या काळामध्ये आकडी येण्याचा त्रास उद्भवू शकतो.

## प्र.२

### माझ्या बाळाला आकडी आली तर मी काय करु?

- एकूण परिस्थितीचा आढावा घ्या.
- ज्याच्यामुळे बाळाला अपाय होईल अशा वस्तू बाळापासून दूर ठेवा.
- मुलांना/ बाळाला सुरक्षित ठिकाणी ठेवा व त्याच्या सोबत रहा.
- जमिनीवर सपाट ठिकाणी ठेऊन डोक्याखाली मऊसर उशीचा आधार द्या आणि शक्य असल्यास सुती व सैलसर कपडे घाला.
- शक्यतो एका कुशीवर बाळाला वळवा व डाव्या कुशीवर वळल्यास अधिक उत्तम.
- आकडी सुरु होण्याची व संपण्याची वेळ नोंदवून ठेवा आणि त्याला किती कालावधी लागतो हे मोजा.
- श्वासोच्छवासावर लक्ष ठेवा.

## प्र.३

### माझ्या बाळाला आकडी येवू नये म्हणून मी काय करु शकते?

- ❑ धीर सोडू नका, घाबरुन जाऊ नका.
- ❑ धोकादायक स्थितीत नसेल तर बाळाला उगाच हलवू नका.
- ❑ बाळाच्या हालचालीवर लक्ष ठेवा.
- ❑ बाळाच्या तोंडात काहीही घालणे व काहीही वास देणे टाळा.
- ❑ आकडीतून पूर्ण बरे झाल्याशिवाय खायला-प्यायला देवू नका.

## प्र.४

### आपोआप बाळाची आकडी थांबली तर मी काय करु?

- ❑ साधारण आकडी ठराविक कालावधीपुरतीच असते आणि शक्यतो स्वत:हून आपोआप थांबते.
- ❑ आकडी ३ ते ५ मिनीटांपर्यंत थांबली तर बाळाला न हलवता बरे वाटेल अशा स्थितीमध्ये राहू द्या.
- ❑ बाळाला गुंगी आल्यासारखे वाटत असेल किंवा झोप येत असेल तर बाळाला झोपू द्या.
- ❑ ताप आहे का हे तपासा.
- ❑ आकडी वरील औषधोपचार सांगितलेल्या योग्य पद्धतीने दिले जाते की नाही ते पहा.
- ❑ आकडी आल्याचे तज्ञ डॉक्टरांना कळवा.

## प्र.५

### बाळाची आकडी ३ ते ५ मिनिटापर्यंत येतच राहिली तर मी काय करु?

- ❑ पहिल्या उत्तरामध्ये दिल्याप्रमाणे प्राथमिक उपचार करा व काळजी घ्या.
- ❑ 'Midazolam Spray' (नाकाद्वारे औषध) 'Diazepam Suppository' (गुदद्वारातून घालण्याची गोळी) ह्या अत्यावश्यक औषधाचा अवलंब करा / वापरा.

प्र.६

## आकडी येते तेव्हा कोणती औषधे जवळ असावीत?

- 'Midazolam' हे औषध नाकपुडीतून देण्याचे आहे. तुमच्या बाळाचे डॉक्टर बाळाला नाकपुडीतून देण्याचे औषध कसे द्यावे हे शिकवतील. त्याचे प्रमाण (मात्रा) ठरवून देतील.

  खाली प्र. क्र.७ आहे या मध्ये मदतीसाठी एक तक्ता दिलेला आहे.

प्र.७

## 'Midazolam' हे नाकपुडीतून देण्याचे औषधाची गरज पडल्यास मी काय करु?

१. बाटलीतील औषध हळूवारपणे हलवा.

२. बाटलीचे झाकण काढा.

३. बाटलीच्या तळाखाली अंगठा ठेवून मधलेबोट व दर्शिका ह्यामध्ये बाटलीचा निमुळता भाग पकडा.

४. प्रथमच हा स्प्रे वापरत असाल तर मुलापासून (बाळापासून) लांब धरुन ६ वेळा तरी बाजूला फवारा उडवून बघा, ह्यामुळे योग्य मात्रेमध्ये औषधाचा डोस देता येणे शक्य होईल. (डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे)

५. मुल जर झोपलेल्या स्थितीमध्ये असेल तर, त्याचे डोके हाताने किंचित उचला आणि फवाऱ्याची निमुळती बाजू काळजीपुर्वक नाकपुडी जवळ धरा.

६. नाकपुडीच्या आतमध्ये निमुळता भाग सरकवा आणि बाटलीच्या तळावर समान दाब देऊन फवारा आत जाऊ द्या. (मुलाने श्वास घेतला नाही तरी चालेल.)

७. औषधाचा फवारा नाकपुडीत मारताना मुलाचे डोके किंचित मागच्या बाजूला ओढून घ्या, ज्यामुळे औषध गिळले जाणार नाही.


८. औषधाचे डोस ज्याप्रमाणे डॉक्टरांनी ठरवून दिले आहेत त्यानुसार अनुक्रमे एकेका नाकपुडीमध्ये फवारा देत जा.

९. जर औषधाचा स्प्रे वापरला नसेल तर त्याचे कार्य योग्यरितीने पुन्हा सुरु करणे गरजेचे आहे. याकरिता त्या स्प्रेचा फवारा २ ते ३ वेळा हवेमध्ये मारा. ज्यामुळे स्प्रेतून योग्य प्रकारे फवारा उडणे सुरु होईल. स्प्रे पुन्हा वापरता येण्यासाठी फवाऱ्याचे टोपण व धुळीपासून संरक्षण करणारे बुच स्वच्छ धुवून मगच लावा.

१०.एकावेळी स्प्रेमधून १.२५ मिलीग्रॅम ते ०.५ मिलीग्रॅम एवढा 'Midazolam' या औषधाची मात्रा येते. मुलाच्या वजनानुसार त्यांना डोस ठरवला जातो, योग्य प्रमाणातील डोस दिला जाणे हे पहाणे महत्वाचे आहे.

११. ५० कि.ग्रॅ. पेक्षा कमी वजन असणाऱ्या रुग्णासाठी ५मिलीग्रॅम तर ५० कि.ग्रॅ.पेक्षा अधिक वजन असणाऱ्या रुग्णासाठी १० मिलीग्रॅम एवढा डोस वापरावा लागतो. हा डोस अनुक्रमे दोन्ही नाकपुड्यांमध्ये समान प्रमाणामध्ये दिला जाणे हे गरजेचे आहे.

१२. लहान मुलांमध्ये 'Midazolam' औषधाची मात्रा (डोस) प्रती किलो ०.२ मिलीग्रॅम एवढी असून ती दोन्ही नाकपुड्यामध्ये समान विभागणी करुन द्यावी.




प्रत्येक नाकपुडीतील 'Midazolam' औषधाची मात्रा ०.५ मिलीग्रॅम एवढी फवारा.

| वय वर्षे | वजन कि. ग्रॅ. | मात्रा (डोस) | प्रत्येक नाकपुडीमध्ये फवारण्याची मात्रा |
|---|---|---|---|
| ६ महिने ते १वर्षे | १० कि.ग्रॅ. पर्यंत | १.२५ते२ मि.ग्र. | १ ते २ |
| १ ते ४ वर्षे | १०ते१६ कि.ग्रॅ. | २ ते ३ मि.ग्र. | २ ते ३ |
| ४ ते १० वर्षे | १६ते३२ कि.ग्रॅ. | ४ ते ६ मि.ग्र. | ४ ते ६ |
| १०पेक्षा जास्त | ३२ कि.ग्रॅ. पेक्षा जास्त | ६ ते १० मि.ग्र. | १० |

५० किलो ग्रॅम पेक्षा वजन कमी असणाऱ्या रुग्णासाठी १.२५ मिलीग्रॅम चे ४ फवारे प्रत्येक नाकपुडीमध्ये मारावेत. असा एक डोस देऊन झाला कि दुसरा डोस ५ मिनिटांनी देऊ शकता.

## प्र. ८

## आकडी येते तेव्हा काय काळजी घ्यावी?

- मुलांच्या श्वासोच्छवासावर लक्ष ठेवा.
- अचानक जोरात श्वासोच्छवास करणे किंवा श्वासोच्छवास मंद होणे अशाप्रकारचा बदल जाणवल्यास फवारा देणे बंद करा व ताबडतोब वैद्यकिय मदत मागा.
- 'Midazolam' चा स्प्रे योग्य पद्धतीने फवारा मारण्याचे काम करतो कि नाही हे तपासण्यासाठी एवादा फवारा हवेमध्ये उडवून त्याची क्षमता तपासा व मगच फवारा करा.
- नेहमी स्प्रे अथवा इतर औषधांच्या मात्रा रुग्णाला देण्यापूर्वी त्यांची अंतिम कार्यकाळ (Expiry) तपासा.

## प्र. ९

## 'Diazepam Suppository' ही गुदमार्गाद्वारे देण्याचा गोळीचा डोस (मात्रा) काय आहे?

- 'Diazepam' कांडी (उपलब्ध असल्यास) ही गोळी गुद्द्वारे (संडासच्या जागेतून) देण्याची आहे.
- मात्रा ०.५ मि. ग्रॅ. / कि. ग्रॅ.

## प्र. १०

## वैद्यकीय मदत किंवा रुग्णालयात नेण्यासाठी मी आकडीच्या कोणत्या क्षणी मदत मागू?

- तुम्ही घाबरला आहात आणि मदतीची गरज असल्यास.
- ५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ आकडी राहिल्यास.
- एका पाठोपाठ एक अशी आकडी येत राहिल्यास.
- बाळाला दुखापत अथवा इजा झाली असेल तसेच श्वसन क्रियेबाबत तुंम्हाला शंका वाटत असेल.
- बाळाला वैद्यकीय मदतीची गरज आहे असे वाटत असल्यास.

## आकडी वरील प्रथोमचार




डोक्याखाली उशी द्या व चष्मा काढून ठेवा



कपडे सैल करा




एका कुशीवर (डाव्या) झोपवा



घड्याळामध्ये बघून आकडीची वेळ मोजा (किती काळ लांबते)



तोंडामध्ये काहीही घालू नका




ID ओळखपत्र शोधा



कशालाही पकडू नका



आकडी बंद झाली की....



मदत मागा